International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# आर्थिक विषमतेचा शिक्षणावर होणारा परिणाम : एक चिकित्सक अभ्यास

**कु. कोमल संदीप माने**

*बळवंत कॉलेज, विटा*

*Corresponding Author – कु. कोमल संदीप माने*

**DOI - 10.5281/zenodo.18655098**

**गोषवारा:**

*प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा तेथील लोकसंख्येवर आधारित असतो, परंतु लोकसंख्या ही शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम असणे गरजेचे असते. अलीकडच्या काळात लोकांचा कल हा सरकारी शाळांवरून खाजगी शाळांकडे जात आहे. कारण प्रत्येक पालकाला आपले पाल्य चांगले, दर्जेदार शिक्षण घ्यावे असे वाटते. परंतु खाजगी शाळांच्या फी या सर्वांनाच परवडतील अशा नाहीत त्यातच एक नवीन संकल्पना शिक्षण क्षेत्रात प्रभुत्व निर्माण करताना दिसत आहे ते म्हणजे 'खाजगी शिकवण्या' होय. त्यामुळे ज्यांना खाजगी शाळा तसेच खाजगी शिकवण्याची फी परवडेल त्यांना चांगली शिक्षण मिळेल अन्यथा जो गट आर्थिक दृष्ट्या असक्षम आहे. त्यांना चांगल्या शिक्षणापासून वंचित राहावे लागते व त्यांचा विकास होत नाही. नेल्सन मंडेला यांनी असे म्हटले होते की "शिक्षण हे सर्वांसाठी उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. ठराविक वर्गापुरते शिक्षण मर्यादित असल्यास समाजामध्ये त्या वर्गाचे प्रभुत्व निर्माण होईल जे लोकशाहीसाठी मारक ठरेल". चांगले व दर्जेदार शिक्षण सर्वांना उपलब्ध होण्यासाठी सरकारने उपाययोजना व सुधारणा करणे गरजेचे आहे. तरच या परिस्थितीमध्ये बदल होईल आणि शिक्षण जे की सध्या एक बाजार घटक मध्ये रूपांतरित झाले आहे ते पुन्हा एक सर्वसामान्यांसाठीचा अधिकार बनेल.*

---

**प्रस्तावना:**

शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण विकासाचे मूलभूत साधन आहे.व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. मात्र भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये आर्थिक विषमता ही एक मोठी अडचण ठरली आहे. समाजातील श्रीमंत व गरीब घटकांमधील आर्थिक तफावत थेट शिक्षणाची उपलब्धता, गुणवत्ता आणि सातत्यावर परिणाम करते. त्यामुळे आर्थिक विषमता आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक विषमतेमुळे गरीब व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शाळेची साधने, तंत्रज्ञान, खाजगी शिकवणी तसेच उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित प्रमाणात मिळतात. अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते किंवा मजुरी कडे वळावे लागते. याउलट आर्थिक दृष्ट्या सक्षम कुटुंबातील विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा सहज उपलब्ध होतात ज्यामुळे शिक्षणातील असमानता अधिक तीव्र होते. भारतीय संविधानाने शिक्षण आणि समानतेच विशेष महत्त्व दिले आहे. भारतीय संविधानाचे कलम १४ सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता प्रदान करते तर कलम १५ धर्म, जात, लिंग, जन्मस्थान इत्यादी आधारांवर भेदभाव करण्यास मनाई करते. शिक्षणाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे असलेले कलम २१A हे ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची हमी देते. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०) नुसार ६ ते १४ ऐवजी ३ ते १८

वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्याचे उद्देश आहे. तरीही प्रत्यक्षात आर्थिक विषमता असल्यामुळे सर्वसमावेशक आणि चांगल्या दर्जाचे शिक्षण सर्वांना उपलब्ध होणे कठीण असते. म्हणूनच प्रस्तुत संशोधनामध्ये आर्थिक विषमतेचा प्राथमिक माध्यमिक आणि उच्च शिक्षणावर होणारा परिणाम तसेच घटनात्मक तरतुदी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अंतर अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. आर्थिक विषमतेमुळे शिक्षणावर कसा परिणाम होतो याचा अभ्यास करणे.

२. समाजातील श्रीमंत व गरीब यांच्यातील वाढत्या दरीचे शिक्षणाच्या उपलब्धतेवर होणाऱ्या परिणामाची माहिती घेणे.

३. दर्जेदार व सर्व समावेशक शिक्षण उपलब्धते साठीचे उपायांची माहिती घेणे.

**संशोधनाची पद्धत:**


प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय (NSSO)द्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या 80 व्या फेरीच्या सर्वेक्षणाचा तसेच विविध मासिके, जर्नल, लेख, वर्तमानपत्रे, पुस्तके इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**आर्थिक विषमतेचे शिक्षणावरील परिणाम:**

**१. शाळांच्या प्रकारानुसार विद्यार्थ्यांच्या नोंदीचे प्रमाण (April -June २०२५):**

शाळांच्या प्रकारानुसार विद्यार्थ्यांचे एप्रिल ते जुन पर्यंत नोंदीचे प्रमाण पुढील तक्त्यामध्ये दर्शवले आहे.

**तक्ता क्र.१**




विश्लेषण तक्ता क्र.१ नुसार असे दिसून येत आहे की शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये जास्त विद्यार्थी सरकारी शाळेमध्ये नोंदणीकृत आहेत. ग्रामीण भागात सरकारी शाळांमध्ये ६०% विद्यार्थी आहेत तर शहरी भागात ते प्रमाण ३०.१% आहे. विनाअनुदानित खाजगी शाळांचा विचार करता ग्रामीण भागांमध्ये त्याचे प्रमाण २४.३% आहे तर शहरी भागात ५१.४% असे आहे. ग्रामीण भागांमध्ये सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असून शहरी भागात खाजगी शाळांमध्ये विद्यार्थी संख्या अधिक आहे.

**२. सरकारी शाळा आणि खाजगी शाळा यांच्यातील शुल्काची तुलना:**

सर्वेक्षणामध्ये असे नमूद करण्यात आली आहे की एका शैक्षणिक वर्षांमध्ये सरकारी शाळांमध्ये ग्रामीण भागात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी रु.८२३ ते माध्यमिक शिक्षणासाठी रु.७३०८ इतकी फी आहे तर शहरी भागामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी रु.१६०३ ते माध्यमिक शिक्षणासाठी रु.७७०४ इतकी फी आहे.


खाजगी शाळांमध्ये ग्रामीण भागात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी रु.१७९८८ ते माध्यमिक शिक्षणासाठी रु.३३५६७ इतकी फी भरावी लागते तसेच शहरी भागात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी रु.२६१८८ ते माध्यमिक शिक्षणासाठी रु.४९०७५ इतकी फी भरावी लागते.

प्रस्तुत आकडेवारीची तुलना घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणाच्या (HCSE) २०२३-२४ दरडोई मासिक खर्च (MPCE) अहवालाशी तुलना करता असे लक्षात आले की, भारतातील सर्वात गरीब 5% लोकांचा दरडोई मासिक खर्च हा खाजगी शाळातील पूर्व प्राथमिक फी इतका आहे. म्हणजेच व्यक्तीने महिनाभर काम करून कमविलेले सर्व पैसे त्याला मुलांच्या शिक्षणासाठी वापरावे लागतील आणि तसे केले तर त्याचा आणि त्याच्या कुटुंबाचा महिन्याभराच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे असे लोक त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यास असक्षम राहतात.चांगले शिक्षण न मिळाल्यामुळे ती मुले मागे राहतात आणि त्याचा परिणाम त्यांच्या वैयक्तिक विकासावर होतो.

**३. खासगी शिकवण्याचे (Private Coaching) प्रभुत्व:**

अलीकडच्या काळात एक संकल्पना खूप लक्ष वेधून घेत आहे ती म्हणजे खाजगी शिकवण्या होय. मुलगा खाजगी शिकवणीत असणे म्हणजे प्रतिष्ठेचे बाब समजण्यात येत आहे. चालू शैक्षणिक वर्षांमध्ये प्रत्येक तिसरा मुलगा हा खाजगी शिकवणी मध्ये होता. त्याचे सर्वाधिक प्रमाण शहरात ३०.७% तर ग्रामीण भागात २५.५% आहे.

**तक्ता क्र.२**




विश्लेषण- प्रस्तुत तक्त्यानुसार असे दिसून येत आहे की, जसे-जसे विद्यार्थी मोठ्या वर्गांकडे वाटचाल करत आहेत. तसे-तसे खाजगी शिकवण्यामध्ये विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण क्षेत्रात देखील हेच प्रमाण दिसून येत आहे. शहरी भागात खाजगी शिकवण्यांवर सरकारी वार्षिक घरगुती खर्च हा प्रति विद्यार्थी रु.३९८८ इतका तर ग्रामीण भागात तो रु. १७९३ इतका आहे.

**खासगी शिकवण्या लावण्यापाठीमागची कारणे:**

शाळांमध्ये दर्जेदार व प्रशिक्षित शिक्षक तसेच शैक्षणिक दृष्ट्या महत्वाच्या असणाऱ्या पायाभूत सुविधांचा अभाव असतो.

**निष्कर्ष:**

प्रस्तुत संशोधनांमधून असे समजते आर्थिक विषमतेचा शिक्षणावर गंभीर परिणाम होतो. गरीब कुटुंबातील मुलांना गरिबीमुळे गरजा पूर्ण करण्यासाठी छोटी मोठी कामे करावी लागतात त्यामुळे त्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. यातूनच त्यांचे ड्रॉप-आऊटचे प्रमाण वाढते. याउलट श्रीमंत कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक समस्या कमी असतात. त्यामुळे त्यांना अधिक संधी मिळतात. ज्यामुळे शिक्षण आणि आर्थिक विकासातील दरी आणखी वाढत जाते त्यामुळे सामाजिक आर्थिक विषमतेचे दुष्टचक्र सुरूच राहते. आणि ते चक्र अश्याच प्रकारे पुढे चालू राहिल्याने पिढ्यानपिढ्या चालणारी असमानता निर्माण होते. त्याचप्रमाणे समाजामध्ये नोकरीबद्दलची असणारी उदासीनता यामुळे शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे.

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सेवाभावी संस्था यांच्याकडून मिळणारी आर्थिक मदत, शिष्यवृत्ती,

विद्यार्थी दत्तक योजना यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

संशोधनावरून असे समजते की कमी आर्थिक उत्पन्नाचे अप्रत्यक्ष परिणाम शिक्षणाच्या उपलब्धतेवर होतो.

**सारांश:**

समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षणाच्या समान संधी मिळणे अत्यंत गरजेचे आहे एकमेव आर्थिक उत्पन्नावर ते निर्भर नसावे. कारण शिक्षण हा असा विषय आहे की ज्यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. जसे की बौद्धिक, शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक होय. जर व्यक्तीकडे चांगले ज्ञान व कौशल्य असेल तर तो स्वतः बरोबर देशाच्या विकासामध्ये देखील योगदान देतो. अपुरे ज्ञान व कौशल्य यामुळे व्यक्तीला चांगल्या दर्जाची नोकरी मिळत नाही व तो आर्थिक दृष्ट्या कमकुवत बनतो. शिक्षण सर्वांना किफायतशीर आणि परवडेल अशा प्रकारचे असणे गरजेचे आहे. त्यामध्ये सरकारद्वारे काही उपाययोजना करता येतील जसे की सरकारी शाळांमध्ये चांगल्या पायाभूत सुविधांची उपलब्धता, शिक्षकांना प्रशिक्षण देणे, खाजगी शाळातील फी बद्दल निर्देशक बनविणे, त्यांच्या वाढीवर रोख लावणे आणि शिक्षकांच्या शैक्षणिक कौशल्यांवर जास्त भर देणे, जेणेकरून पालकांना खाजगी शाळा किंवा खाजगी शिकवणी ची गरज भासणार नाही व त्यांच्यावरील खर्चाचा भार कमी होईल. एका अभ्यासामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की खाजगी शिकवण्या या शाळेच्या गुणवत्ता निर्देशकांशी नकारात्मकरित्या जोडल्या जातात. म्हणजे चांगल्या शाळा या खाजगी शिकवण्यांवर कमी निर्भर असतात.

**संदर्भ:**


1. Kothari C.R.- Research Methodology: Methods and Techniques
2. Ministry of Statistics and Program Implementation: NSSO 80th Round Report on Education
3. pib.gov.in
4. Vachaspati Shukla, Santosh Kumar Dash ,'The Hindu' Newspaper
5. Puri V.K.,Mishra S.K.(2013)'Indian Economy'( 31st edition ) Himalaya Publishing House Pvt.Ltd
6. Laxmikant M.(2019)'Indian Polity'(6th Edition)McGraw Hill Education Pvt.Ltd